# मेट्रो ३चे पहिल्या टप्प्याचे ८७ टक्के काम पूर्ण

म. टा. खास प्रतिनिधी

- रुळांची कामे ८५.२० टक्के पूर्ण
- आरे स्थानकाचे बांधकाम मात्र २७ टक्केच



**मुंबई :** डिसेंबरमध्ये सुरू होणाऱ्या मेट्रो मार्गिकेच्या पहिल्या टप्प्यातील ८७ टक्के पूर्ण झाले आहे. मात्र या टप्प्यातील आरे स्थानकाचे काम २७ टक्केच पूर्ण झाले आहे. कुलाबा-वांद्रे-सीप्झ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मेट्रो ३ या भूमिगत मेट्रोचा ही स्थिती आहे.

मेट्रो ३ ही मुंबईच्या पश्चिम उपनगरांना उत्तर-दक्षिण जोडणारी मार्गिका आहे. उत्तरकडे आरे ते दक्षिणेकडे कफ परेडपर्यंत ही मार्गिका असेल. या मार्गिकेचा पहिला टप्पा डिसेंबर २०२३ पर्यंत सुरू करण्याचे उद्दिष्ट प्रकल्प विकसित करणाऱ्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने (एमएमआरसी) निश्चित केले आहे. या पहिल्या टप्प्यातील कामे सरासरी ८७ टक्के पूर्ण झाल्याचे कंपनीचे म्हणणे आहे.

या मार्गिकेचा पहिला टप्पा आरे ते बीकेसी असा असेल. त्यामधील स्थानकांची उभारणी ९२.९० टक्के तर स्थानकांशी संबंधित भुयारीकरणाचे काम ९७.७० पूर्ण झाले आहे. पहिल्या टप्प्यातील रुळांची कामे ८५.२० टक्के पूर्ण झाली आहेत. एकूण प्रणालीचा विचार केल्यास ती कामे मात्र ६४.७० टक्केच पूर्ण झाली आहेत. तर वीज पुरवठ्यासंबंधीची कामे ५७.९० टक्के पूर्ण झाली आहेत. मात्र या सर्व स्थितीत आरे स्थानकाचे काम अद्यापही फक्त २७ टक्केच पूर्ण झाले आहे.

मेट्रो ३ मार्गिकेतील कारशेडजवळील पहिले स्थानक 'आरे' आहे. एकीकडे विविध कारणांमुळे आरे कारशेडला विलंब झाल्याने मार्गिकेलादेखील वर्षभराचा विलंब झाला आहे. त्या स्थितीत आरे स्थानक उभारणीचे काम अद्यापही २७.३० टक्के तर स्थानकातील प्रणालीशी संबंधियफत कामे १४.४० टक्के पूर्ण झाले आहे. मागील महिन्यात स्थानक उभारणीचे काम २२ टक्के पूर्ण झाले होते, हे विशेष. मार्गिका सुरू होण्याआधी स्थानक उभारणी झालेली असेल, असा विश्वास एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालिका अश्विनी भिडे यांनी 'महाराष्ट्र टाइम्स'शी बोलताना व्यक्त केला होता.